The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
==========================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
--------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
==========================================================================

# मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**ह.भ.प. तुकाराम महाराज ठाकूरबुवा दैठणकर**

"संतांचा महिमा तो बहु दुर्गम| शाब्दिकांचे काम नाहीं येथे ||१||
बहु दुधड जरी झाली म्हैस गाय | तरी होईल काय कामधेनु ||२||
तुका म्हणे अंगे व्हावे तें आपण | तरीच महिमान येईल कळों ||३||"

संत तुकाराम महाराज एका ठिकाणी पुन्हा बोलतात "काय वानूं आतां न पुरे ही वाणी | मस्तक चरणी ठेवीतसे ||" एकूणच तुकाराम महाराजांसारखे महान संत ज्यांच्या वाणीचा प्रभाव आज सर्व महाराष्ट्रभर गाजतो, ते सुद्धा संतांचे वर्णन करण्याबद्दल स्वतःला अपूर्ण मानतात आणि शरणागती स्वीकारतात. तर तेथे सामान्य शब्द ज्ञानाने संतांच्या व्यक्तित्वाबद्दल आणि कार्याबद्दल काय बोलावे?

परंतु संतांच्या वर्णनाने आपली वाणी पुण्यवंत होते. "पुण्यवंत व्हावे | घेता सज्जनांची नावे ||" माऊली श्री ज्ञानेश्वरी मध्ये म्हणतात "ते ही प्राणा परोते | आवडती निरुते | जे भक्त चरित्राचे | प्रशंसीती||"

प्रमुखतः मानवी जीवनाचे दोन अंग आहेत. एक ऐहिक, जो प्रारब्धाशी संबंधित आहे. तर दुसरे पारमार्थिक जो पूर्णतः प्रयत्न आणि संत कृपेशी जोडलेले आहे. मानवी जीवनाची मांडणी परमार्थिक उन्नतीसाठी आहे आणि त्यामुळे संत-मार्गदर्शन व ईश्वर-कृपा महत्त्वाची ठरते. या विश्वामध्ये परमार्थ चालतो आणि वाढविला जातो, तो फक्त एका संतामुळेच. त्यामुळे संत आणि त्यांचे मार्गदर्शन या विश्वामध्ये अत्यंत मौलिक असे आहे आणि त्याची निष्ठा नित्य गरज आहे. संत नामदेव म्हणतात-

"अकल्प आयुष्य व्हावे तया कुळा | माझीया सकळां हरी च्या दासा ||१||
कल्पनेची बाधा नहो कवणे काळी | ही संत मंडळी सुखी असो ||२||"

याचाच अर्थ या जगतामध्ये संतांचा वावर नित्य असला पाहिजे, तरच ऐहीकातेमध्ये पूर्णतः अडकलेल्या समाजाला त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन प्राप्त होईल. यामुळे संतांची गरज या जगाच्या कल्याणार्थ अत्यंत महत्त्वाचे आहे. संतांच्या व्यक्तीत्वाबद्दल आणि कर्तुत्वाबद्दल आढावा घ्यावयचा असेल तर त्यासाठी सर्वप्रथम पूर्वीच्या संत महंतांनी लिहिलेले संतांचे चरित्र महत्त्वाचे ठरतात. संत चरित्रावर अनेकांनी लिहिलेले आढळते. परंतु त्या चरित्रांमध्ये त्यांच्या लौकिक जीवनाचा आणि चमत्काराचा भाग अधिक दिसतो. संतांच्या ग्रंथ-संपदा संत जीवनाची स्पष्टता करण्यासाठी

अधिक महत्त्वाच्या आहेत. संतांचे आध्यात्मिक मार्गदर्शनपर जे ग्रंथ आहेत, ते त्यांच्या अनुभूतीवर आधारलेले आहेत.

"अनुभवे आले अंगा | ते या जगा देतसे ||" याचाच अर्थ ते जे आध्यात्मिक जीवन जगले आहेत, तीच त्यांनी आपल्या रचनांद्वारे प्रकट केले आहे. म्हणून खरे व्यक्तित्व आणि कार्य त्यांच्या ग्रंथरचनेच्या आधारावरच शोधावे लागते. तिसरा भाग ते जे सिद्धांत स्पष्ट करीत असतात, तेही पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण जे सिद्धांत स्वतः जगून इतरांना स्पष्ट करतानी दिसतात. तूकाराम महाराजांनी स्वतंत्र असा एक अभंग लिहिला आहे आणि त्याद्वारे त्यांनी त्यांच्या अवताराचे प्रयोजन काय आहे हे स्पष्ट केले आहे. "आम्ही वैकुंठवासी | आलो याची कारणासी | बोलीले जे ऋषी | साच भावे वर्ताया ||" आम्ही म्हणजे आम्ही सर्व संत मुळात ब्रह्मस्वरूपच आहोत, परंतु या जगामध्ये विशेष अशा उद्देशाने अवतार घेतो त्यातही महत्वाचे म्हणजे पूर्वी व्यास-वाल्मीकादि ऋषींनी भक्तीपर ग्रंथरचना केल्या आहेत. ज्या संस्कृत मध्ये असून सामान्यांच्या आकलनाच्या पलीकडच्या आहेत. करिता त्यांनी जो भक्ती-आचार मानला आहे. तो आम्ही लोकांना आचरण करून दाखवीत आहोत. तसेच त्यांच्या बोली भाषेत मार्गदर्शन करीत आहोत. कारण भक्ती अध्यात्म ही बोलण्या ऐकण्याचा विषय नसून आचरणाचा विषय आहे.

यावरून संतांच्या व्यक्तित्वाचे आकलन करण्याकरिता खूप दक्षता घेण्याची गरज आहे. संत जेव्हा या मृत्यूलोकात अवतार घेतात. तेव्हा येथील नियमाप्रमाणे त्यांना कोणाच्या तरी कुशीत जन्म घ्यावा लागतो. त्या जन्माबरोबर जगातल्या उपाधी-जसे नाव, गाव, जात, धर्म हे स्वीकारावे लागतात तसेच या जगातील परिस्थितीचा आणि सुख-दुःखांचा ही ते स्वीकार करतात. म्हणून त्यांच्या जीवनात काही चांगले वाईट प्रसंग पाहायला मिळतात. अनेक वेळा कोणी त्यांना त्रास देतो, कष्ट देतो असेही दिसते. परंतु, तुकाराम महाराजांनी त्यांच्या वाङ्मयात लिहिले आहे कि "आम्हा गांजी जन | तरी का मेला नारायण||" आम्हा संतांना लोक त्रास देतात असे जर स्पष्ट झाले तर देवाच्या अस्तित्वाबद्दलच शंका निर्माण केली जाऊ शकते. याचाच अर्थ जगात संताना कोणीही त्रास देऊ शकत नाही. खरे म्हणजे त्यांच्या जीवनातील या घटना आणि त्याबद्दलचे आपले आकलन अपूर्ण असते. त्यांच्या जीवनातील या घटनांना विशेष महत्त्व आहे, जसे रामेश्वर भट्ट यांनी तुकाराम महाराजांची परीक्षा घेतली त्यांचे अभंग डोहात बुडवीन्यास भाग पाडले. त्यामुळेच जगाला कळले की तुकाराम महाराजांचे अभंग खरोखरच भंग न पावणारे आहेत आणि प्रत्यक्ष देवाने आपल्या हाताने ते ग्रंथ इंद्रायणीतून काढून जगापुढे प्रकाशित केले, या ठिकाणी रामेश्वरांनी दिलेला त्रास नसून त्यांनी संत तुकाराम महाराजांचे आणि ग्रंथांचे महात्मे जगाला दाखवून दिले.

"देवते संत देवते संत | निमित्त त्या प्रतिमा ||" या भूतलावर संत प्रत्यक्षात दिसणारे देवच आहेत. म्हणून त्यांच्याजवळ "कर्तुम्-अकर्तुम्, अन्यया कर्तुम् समर्थः|" असे सामर्थ्य आहे. एक तर मुळातच ते आत्मानुभूती प्राप्त असे आहेत आणि इतर दुसरे म्हणजे त्यांच्या समोरील पूर्ण समाज

आत्मानुभूती विरहित आहे. तसे पाहिले तर त्यांच्या जीवनातील लौकिक सुखदु:खाचा भाग हा त्यांनी स्वीकारलेला असून तो खरा नाही. या उलट त्यांचे पामार्थिक जीवन पूर्ण आणि खरे आहे. बाकीच्या समाजाचे लौकिक आणि ऐहीक जीवन खरे आहे तर त्यांचे परमार्थिक जीवन अपूर्ण आणि अनुभव सिद्ध नाही. म्हणून समाज संताकडे त्यांच्या लौकिक दृष्टीने पाहतो किंवा पाहू शकतो. म्हणून तो संतांच्या जीवनातील लौकिकतेलाच चिकटलेला असतो. आणि त्याचाच तो रमतो. म्हणून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ आणि इतर यांच्या जीवनातील लौकिक बाजूंचा अधिक विचार करतो आणि त्यांना तेच खरे आहे असे वाटते. म्हणून संताचे चरित्र भावना प्रधानतेने लौकिकतेकडेच चुकलेले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या जीवनात जे काही चमत्कार आहे त्याला आपण चमत्कार म्हणू कारण आपण आत्मानुभूती शून्य आहोत आणि ज्ञानदेव संताबद्दल बोलताना म्हणतात की "किंबहुना चराचर | आपण जाला ||" सर्व चराचरा विश्व हे चैतन्य स्वरूप आहे आणि ज्ञानदेवांसाठी ते त्यांचे अंगच आहे म्हणून त्या जड भिंतीलाही तेच चालू शकले कारण भिंत आणि ज्ञानेश्वर वेगळे नव्हतेच; परंतु ते कळण्यासाठी आत्मानुभूती असणे जरुरी आहे. म्हणून आपणास ते चमत्कार वाटतात. किंवा कधी कधी खोटेही वाटते. म्हणून संतांच्या जीवनाकडे व्यक्तित्वाकडे आणि कार्याकडे पाहताना आध्यात्मिक भूमिकेवरच पहावे लागते अन्यथा ते कळतच नाहीत.

संत कार्याचा जर विचार केला आणि तोही त्यांचा ग्रंथरचनेच्याद्वारे केला तर प्रथम हे स्पष्ट होते की ते समाजाच्या ऐहीक उन्नतीबद्दल बोलू इच्छित नाहीत. कारण त्यांना प्राप्त असलेले ऐहीक जीवन हे त्यांचे प्रारब्ध निश्चित करीत असते. "अन्न मान धन | हे तो प्रारब्धा अधीन ||" त्यामुळे ते समाजाला ऐहीकतेबद्दल फारसे सांगत नाहीत उलट ते ऐहीकतेपासून समाजाला दूर करू इच्छितात आणि त्यांचे भक्ती, अध्यात्मिक जीवन उन्नत करू इच्छितात. काही ठिकाणी लौकिक जीवनाबद्दल संत बोलताना आढळतात परंतु ते बोलण्यामागे अंतिमरीत्या परमार्थासाठी महत्त्वाचे सूचन असते.

"मज समग्राते जाणसी ऐसे | तळहातीचे रत्न जैसें |
तुज ज्ञान सांघैन तैसें | विज्ञानेसी || ज्ञाने. ७.२||"

संतांचा मुख्य हो हेतू आध्यात्मिक जाणीव करून देण्यासाठी असतो. परंतु ते प्रपंचाचीही स्पष्टता करताना आढळतात. प्रपंच स्पष्ट करण्यामध्ये त्यांचा मुख्य हेतू असा असतो, की प्रपंचाची आसक्ती मानवाला भगवद्भक्तीपासून दूर नेते. म्हणून अशाची आसक्ती असता कामा नये. एकूणच संतांच्या कार्याचा मुख्य हेतू हा आहे की या विश्वाकडे विश्वात्मक देव म्हणून पहावे. आत्म जाणिवेवर स्थिर राहावे आणि आपल्या कार्माच्या केंद्रस्थानी आत्मा असावा आणि मानवाने सातत्याने या विश्वाचा चालक जो ईश्वर आहे त्याचे रक्षण करावे आणि कृतज्ञतेने त्याला शरण असावे हेच सुख-शांती-समाधानाचे साधन आहे.

**मराठी संतांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व**
-ह.भ.प. तुकाराम महाराज ठाकूरबुवा दैठणकर